# दैनिक लोकांकीत

**सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र**

मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • गुरुवार दि.४ जून २०२६ • अंक-१२५ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.


## मुलाला उमेदवारी न मिळाल्याने गुलाबराव पाटील नाराज

**मुंबई-**जळगाव विधान परिषदेची जागा भाजपच्या वाट्याला गेल्याने आपल्या मुलाला आमदार करण्याचे शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांचे स्वप्न अधुरे राहिले असून, यावरून ते प्रचंड नाराज आहेत. या जागेसाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी वारंवार चर्चा करूनही भाजपने ही जागा न सोडल्याने पाटील यांच्या मनातील खदखद कायम आहे. आज पुन्हा एकदा त्यांनी आपल्या खास शैलीत, 'नसीब में होगा तो उचलकर आयेगा, नही होगा तो' अशी शेरोशायरी करत आपल्या मनातील या तीव्र भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.गुलाबराव पाटील म्हणाले, अनेक लोक म्हणतात की तुम्हाला विधानपरिषदेसाठी तिकीट मिळाले नाही.

# राज्यातील प्रत्येक क्रीडांगणांवर स्वच्छतागृहे, चेंजिंग रूम, प्रकाशयोजनांसह सीसीटीव्ही सुविधा अनिवार्य करण्याबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महिला खेळाडू विविध क्रीडा प्रकारांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यांना अधिक सुरक्षित, सन्मानजनक आणि प्रोत्साहनपर वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील क्रीडांगणांच्या विकासासोबतच प्रत्येक क्रीडांगणावर मॉडेल स्वच्छतागृहे, पुरेशी प्रकाशयोजना, स्वतंत्र चेंजिंग रूम आणि सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत राज्यस्तरीय एकसंध धोरण तयार करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

सन २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नावरील आश्वासनाच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार चित्रा वाघ, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल(दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा व युवक सेवा विभागाचे आयुक्त दीपक सिंगला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.राज्यातील महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्यावतीने विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांना सुरक्षित आणि सक्षम वातावरण मिळावे यासाठी आवश्यक त्या सुविधा व तरतुदी करण्यात येत आहेत. क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण व्यवस्था, आर्थिक पाठबळ, पोषण, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, सुरक्षित वातावरण आणि सामाजिक स्वीकार या



बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या.

महाराष्ट्र शासनाने क्रीडा क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्याचा निर्धार केला असून नव्या क्रीडा धोरणाद्वारे खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारला आहे. ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिला खेळाडूंना क्रीडांगणांवर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांच्या सहभागात आणि कामगिरीत अधिक सुधारणा होईल.राज्यातील सर्व क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी एकसूत्रता राखत संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, तसेच याबाबत कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिले.बैठकीत राज्यातील क्रीडांगणांवरील महिला खेळाडूंसाठीच्या मूलभूत सुविधांची सद्यस्थिती, आवश्यक सुधारणा आणि भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# पुणे हातभट्टी विशारू दारूच्या प्रकरणी अनेकांच्या बदल्या

**पोलीस निरीक्षक (सध्याचे ठिकाण) - बदलीचे ठिकाण**

| | | |
|---|---|---|
| संदीप देशमाने | वपोनि. कोथरूड पो. स्टे. | वपोनि. फरासखाना पो. स्टे. |
| रुणाल सुजाउद्दीन मुल्ला | पोनि. वाहतूक शाखा | वपोनि. डेक्कन पो. स्टे. |
| मानसिंग पाटील | वपोनि. काळेपडळ पो. स्टे. | वपोनि. भारती विद्यापीठ पो. स्टे |
| अरुण घोडके | पोनि. विश्रामबाग पो. स्टे. | वपोनि. कोथरूड पो. स्टे. |
| राजेंद्र भाऊराव पन्हाळे | वपोनि. लोणी काळभोर पो. स्टे. | वपोनि. विश्रांतवाडी पो. स्टे. |
| संतोष खेतमाळस | वपोनि. लष्कर पो. स्टे. | वपोनि. कोंढवा पो. स्टे. |
| पंडित रेजितवाड | पोनि. गुन्हे शाखा | वपोनि. वानवडी पो. स्टे. |
| युवराज हांडे | पोनि. गुन्हे शाखा | वपोनि. लष्कर पो. स्टे. |
| गिरीषा निंबाळकर | वपोनि. डेक्कन पो. स्टे. | वपोनि. काळेपडळ पो. स्टे. |
| संजय करनूर | पोनि. गुन्हे, खडक पो. स्टे. | वपोनि. नऱ्हे पो. स्टे. |
| प्रदीप पवार | पोनि. गुन्हे, लष्कर पो. स्टे. | वपोनी. लोणी काळभोर पो. स्टे. |
| प्रशांत भस्मे | वपोनि. फरासखाना पो. स्टे. | पोनि. गुन्हे शाखा |
| राहुलकुमार खिलारे | वपोनि. भारती विद्यापीठ पो. स्टे. | पोनि. गुन्हे शाखा |
| भाऊसाहेब पाटील | वपोनि. वानवडी पो. स्टे. | पोनि. गुन्हे शाखा |
| आसाराम शेटे | वपोनि. नऱ्हे पो. स्टे. | पोनि. आर्थिक गुन्हे शाखा |
| उत्तम नामवाडे | पोनि. गुन्हे, फरासखाना पो. स्टे. | पोनि. विशेष शाखा |
| नवनाथ जगताप | पोनि. कोंढवा पो. स्टे. | पोनि. गुन्हे, विश्रामबाग पो. स्टे. |
| संगिता जाधव | पोनि. वानवडी पो. स्टे. | पोनि. वाहतूक शाखा |

**पूणे । रमेश जयस्वाल**

पुण्यातील हडपसर,उरळी कांचन, लोणी काळभोर आणि ईतर ठिकाणी हातभट्टी विषारी दारू पिऊन अनेकांचा मृत्यू झाल्या नंतर शहरातील विविध पोलीस ठाण्यातील वरिष्ठ निरिक्षकांच्या बदल्या पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी एका आदेशाव्दारे केल्या आहे यात प्रत्यक्षात गोखलेनगर,पांडव नगर,वडार वाडी या ठिकाणी ५०० लिटर हातभट्टीची विषारी दारू उत्पादन शूल्क विभागाने पकडली असतांनाही या पोलिस ठाण्या अंतर्गत पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षकावर कारवाई का करण्यात आली नाही आजही या ठिकाणी हातभट्टी सह ईतर दारू राजेरोसपणे विक्री केली जात असल्याचे वृत्त आहे तसेच पाषाण लबानी तांडा येथे सूध्दा हातभट्टीची दारू विक्री केले जात आहे हा विभागही चतु: श्रुगी पोलीस ठाण्या अंतर्गत येत आहे त्यामूळे या हातभट्टी विक्री करणा-यांनी ईतर ठिकाणी हातभट्टी दारू विक्रीचा व्यवसाय सुरू केलेला दिसत आहे शहरातील सर्वंच पोलीस ठाण्यातील अधिकारी सह कर्मचारी अर्थकारणात गूंतलेले दिसत आहे.

# विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे सर्व १७ उमेदवार विजयी होतील-रविंद्र चव्हाण

**मुंबई । प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्वच्या सर्व १७ अधिकृत उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी व्यक्त केला. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी श्री.चव्हाण यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी या महायुतीच्या घटक पक्षांतर्फे घेण्यात आलेल्या या संयुक्त पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, शिवसेना नेते राहुल शेवाळे, भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार उत्तम प्रकारे काम करत असताना राज्यात महायुतीचे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदशनाखाली घोडदौड करत आहे. शेतकरी, कष्टकरी या वर्गाच्या हिताचे निर्णय धडाक्याने घेतले जात आहेत. त्यामुळे १८ जून रोजी होणारी विधान परिषदेची निवडणूक महायुतीतर्फेच लढण्याचा निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी या जागांबाबत एकत्र बसून चर्चा केली



आणि जागांचे वाटपही केले. या नेत्यांनी जाहीर केलेल्या अधिकृत उमेदवारांना निवडून देण्याच्या सूचना महायुतीच्या संबंधित मतदारांना देण्यात आल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले.या निवडणुकीत अनेक वर्षे काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनीही उमेदवारी अर्ज भरले आहेत. बंडखोरी करत कुणी अर्ज भरले असतील त्यांनी वरिष्ठांशी बोलून आपले अर्ज मागे घ्यावेत. त्यांच्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा निर्णय कालच्या बैठकीत झाल्याचे चव्हाण म्हणाले.यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे म्हणाले, महायुतीतर्फे समन्वय साधत सर्वांना सामावून घेण्याची भूमिका घेण्यात आली आहे. महायुतीच्या १७ अधिकृत उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत देण्याचे आवाहन त्यांनी संबंधित महापालिकांचे नगरसेवक, पंचायत समितीचे सभापती आणि नगर पंचायतीच्या नगरसेवकांना केले. उद्या उमेदवारी मागे घेण्याचा अखेरचा दिवस असल्याने त्यानंतर महायुतीचे केवळ अधिकृत उमेदवार रिंगणात राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.ज्या कार्यकर्त्यांनी अर्ज भरले आहेत त्यांच्याशीच एकनाथ शिंदे यांनी चर्चा केली असून त्यांच्या कार्याचा सन्मान केला जाईल. त्यामुळे महायुतीचेच सर्व उमेदवार निवडून येतील, असे राहुल शेवाळे यांनी ठामपणे सांगितले.

# आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्सचा महाराष्ट्रात विस्तार; टिटवाळा येथे नवीन शाखा सुरू

## लाँच ऑफर: शून्य लॉगइन फी आणि ५० लाख रूपयांपर्यंत तात्काळ कर्ज मंजूरी

**नवी मुंबई / टिटवाळा । प्रतिनिधी**

आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एबीएचएफएल) या आघाडीची हाऊसिंग फायनान्स कंपनी आणि आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या उपकंपनीने संपूर्ण भारतात वितरण नेटवर्कचा विस्तार करण्याच्या आपल्या व्यापक योजनेचा भाग म्हणून टिटवाळा येथे नवीन शाखा सुरू केली आहे, ज्यासह महाराष्ट्रातील आपला विस्तार वाढवला आहे. या नवीन शाखेसह, एबीएचएफएलचे महाराष्ट्रातील एकूण नेटवर्क आता ३४ शाखांवर पोहोचले आहे, ज्यामुळे वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमधील त्यांची उपस्थिती दृढ झाली आहे, तसेच ग्राहकांसाठी उपलब्धता अधिक सोपी झाली आहे.टिटवाळा हे मुंबई महानगर प्रदेशातील, विशेषतः 'बियॉन्ड ठाणे' (ठाण्यापलीकडील) पट्ट्यात परवडणाऱ्या घरांचे एक महत्त्वाचे ठिकाण म्हणून उदयास आले आहे. रेल्वे आणि रस्ते कनेक्टिव्हिटीमधील सुधारणा, सुरू असलेले निवासी विकास प्रकल्प आणि पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्यांची वाढती मागणी यांमुळे या भागाचा विकास वेगाने होत आहे.




सुलभ किमतीत दर्जेदार घरे शोधणाऱ्या पगारदार आणि उदयोन्मुख-उत्पन्न गटातील कुटुंबांच्या वाढत्या प्राधान्यामुळे टिटवाळा शाश्वत वाढीच्या महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देतो. ही नवीन शाखा एबीएचएफएलला सानुकूलित आणि सुलभ गृहकर्ज उपायांद्वारे व्यक्तींच्या या महत्त्वाकांक्षांना पाठिंबा देण्यास सक्षम करेल.एबीएचएफएल परवडणारी घरे, प्राईम हाऊसिंग, कन्स्ट्रक्शन फायनान्स आणि मालमत्तेवर कर्ज यांसह विविध ग्राहक घटकांसाठी तयार केलेल्या हाऊसिंग फायनान्स सोल्यूशन्सची व्यापक श्रेणी देते. हे सोल्यूशन्स पगारदार व्यक्ती, स्वयंरोजगार व्यावसायिक, स्वयंरोजगार बिगर-व्यावसायिक आणि उदयोन्मुख उत्पन्न गटांच्या गरजा पूर्ण करतात. प्रबळ डिजिटल परिसंस्थेच्या पाठबळासह एबीएचएफएल विनासायास ऑनबोर्डिंग, जलद मंजूरी आणि सुधारित पारदर्शकता प्रदान करते, ज्यामुळे ग्राहकांना उत्कृष्ट अनुभव मिळतो.

या लाँचच्या निमित्ताने, एबीएचएफएल शून्य लॉगइन फी सोबत ५० लाख रूपयांपर्यंतचे स्पॉट लोन सँक्शन (तात्काळ कर्ज मंजुरी) ऑफर करत आहे. ही ऑफर ३ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत वैध असेल, ज्यामुळे या नवीन शाखांमधील ग्राहकांना जलद आणि अधिक परवडणाऱ्या दरात कर्ज मिळवणे शक्य होईल.या विस्तारीकरणाबाबत मत व्यक्त करत आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे एमडी आणि सीईओ पंकज गाडगीळ म्हणाले, महाराष्ट्र आमच्यासाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथील प्रबळ मागणी आणि वाढत्या महत्त्वाकांक्षा पाहता ग्राहकांशी संपर्क अधिक दृढ करण्यासाठी आम्ही आमची प्रादेशिक उपस्थिती वाढवत आहोत. आमच्या वाढत्या वितरण नेटवर्कला प्रबळ डिजिटल क्षमतेची जोड देऊन ग्राहकांसाठी घर खरेदीचा प्रवास सोपा, जलद आणि त्रासरहित बनवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

आपल्या 'हॅपी होम लोन जर्नी' या आश्वासनाशी सुसंगत असलेला हा विस्तार एबीएचएफएलचे ग्राहक-केंद्रितता, जबाबदार कर्ज वाटप आणि वैविध्यपूर्ण व सखोल रिटेल पोर्टफोलिओच्या माध्यमातून आर्थिक समावेशनाला गती देण्यावर असणारा निरंतर भर सादर करतो.

# नवी मुंबईत महाविकास आघाडीचा एल्गार: आबा दळवी जिल्हा अध्यक्ष काँग्रेस नवी मुंबई आणि कमिटीचा उत्स्फूर्त सहभाग महागाई आणि इंधन दरवाढी विरोधात भाजप सरकारचा निषेध

**नवी मुंबई (वाशी) । प्रतिनिधी**

गगनाला भिडलेली महागाई, पेट्रोल-डिझेलची सातत्याने होणारी दरवाढ आणि राज्यात फोफावलेली बेरोजगारी या ज्वलंत प्रश्नांवरून महाविकास आघाडीने (MVA) सत्ताधारी सरकारविरोधात रणशिंग फुंकले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नवी मुंबईतील वाशी येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) प्रणित भाजप सरकारच्या जनविरोधी धोरणांविरुद्ध जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांचा आक्रोश आणि संताप व्यक्त करण्यात आला.



**आंदोलनातील प्रमुख मुद्दे**

**इंधन दरवाढीचा भडका**

सातत्याने वाढणाऱ्या पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमुळे वाहतूक खर्च वाढून सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे.

केंद्रातील आणि राज्यातील सरकारने इंधनावरील अन्यायकारक कर कमी करून जनतेला तातडीने दिलासा द्यावा, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

**जीवनावश्यक वस्तूंची महागाई**

स्वयंपाकाचा गॅस, खाद्यतेल, भाजीपाला आणि अन्नधान्यांचे गगनाला भिडलेले दर यामुळे गरिबांचे आणि मध्यमवर्गीयांचे जगणे कठीण झाले आहे.

सरकार केवळ पोकळ आश्वासने देत असून महागाई नियंत्रणात आणण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

**तरुणांमधील वाढती बेरोजगारी**

राज्यातील महत्त्वाचे रोजगारक्षम प्रकल्प परराज्यात जात असल्यामुळे स्थानिक तरुणांच्या हाताला काम उरलेले नाही. शासकीय विभागातील रिकाम्या पदांच्या भरत्या रखडल्या असून, नवीन रोजगार निर्मितीच्या आघाडीवर भाजप सरकारची धोरणे फोल ठरली आहेत.

**आरएसएस-भाजप धोरणांवर टीका**

हे सरकार 'आरएसएस'च्या इशाऱ्यावर चालत असून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याऐवजी केवळ मूठभर भांडवलदारांचे आणि उद्योगपतींचे खिसे भरण्याचे काम करत असल्याची घणाघाती टीका महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली.

प्रमुख मागण्या-पेट्रोल-डिझेलचे दर कमी करणे, रोजगार निर्मिती आणि महागाई नियंत्रण ।

**सरकारला थेट इशारा**

जनतेच्या संयमाचा अंत पाहू नका. जर इंधन दरवाढ आणि महागाई त्वरित आटोक्यात आणली नाही, तर आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल आणि नवी मुंबईतून थेट मंत्रालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा स्पष्ट आणि संतप्त इशारा महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी दिला.

या आंदोलनात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नवी मुंबईतील अनेक वरिष्ठ नेते, पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आणि महागाईने होरपळलेले सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'भाजप सरकार हाय हाय', 'महागाई कमी करा' अशा घोषणांनी वाशी परिसर दणाणून गेला होता.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे महाराष्ट्र अध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे आमदार रोहित पवार मंगेश आम्ले नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष आणि काँग्रेस पक्षाचे रामचंद्र आबा दळवी - नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष ,संतोष सुतार - उपाध्यक्ष ,,तुकाराम कदम - कार्याध्यक्ष ,,महेश भणगे इंटक अध्यक्ष- नवी मुंबई ,,अन्बर हवळदार - अत्यसंख्याक अध्यक्ष- नवी मुंबई ,,संतोष पाटील ओबीसी जिल्हा अध्यक्ष नवी मुंबई ,,दत्ता जाधव नेरूळ ब्लॉक अध्यक्ष

प्रतिक यादव ब्लॉक अध्यक्ष नेरूळ अजा विभाग,,मुस्ताक काझी -अत्यसंख्यांक ब्लॉक अध्यक्ष,,साहेब एस. यादव,,-बाळकृषण चराटे,,श्रीकृष्ण गायकवाड,दत्ता जाधव नेरुळ ब्लॉक अध्यक्ष,,उज्वला साळवे,,युवक अध्यक्ष,,विनोद गढ़ाने,,सुनिल मिश्रा,,अक्रम खान,अशोक निकम,अरविंद सोनटक्के ज्येष्ठ पदाधिकारी नेते आणि शेकडो काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवा शहरातील नालेसफाईच्या कामांची पोलखोल दिवा मनसेची तात्काळ कारवाईची मागणी

**संतोष पडवळ । दिवा**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराचे शहराध्यक्ष श्री. तुषार भास्कर पाटील यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देऊन दिवा शहरात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दरवर्षीप्रमाणे यंदाही ३१ मे पूर्वी नालेसफाईची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. मात्र, पावसाळा तोंडावर असताना देखील कामांचा वेग अत्यंत संथ असल्याचे दिसून येत आहे. परिणामी अल्प पावसातही शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळेल असे मनसेने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

यंदा नालेसफाईसाठी सुमारे १ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एवढा मोठा खर्च करूनही कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने होत नसल्यास तो सार्वजनिक निधीचा



अपव्यय आहे. दिवा प्रभाग समिती मधील प्रभाग क्रमांक २७, २८ आणि २९ मध्ये मोठा गाजावाजा करत नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. संबंधित नालेसफाईच्या कंत्राटदाराला सहाय्यक आयुक्तांसमोरच फोन केला असता कंत्राटदाराने २५० कामगार नालेसफाई साठी काम करत असल्याची माहिती दिली. पण काम कुठे सुरू आहे याची माहिती विचारातच कुठलेही समाधानकारक उत्तर कंत्राटदाराला देता आले नाही. ज्या स्वच्छता निरीक्षकांनी या सर्व कामावर देखरेख ठेवायला हवी त्या स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी यांनाही नालेसफाई नेमकी कुठे सुरू आहेत तिथे किती कामगार काम करतात याची माहिती नव्हती. अशा पद्धतीने जर दिवा शहरात कमी होत असतील तर नालेसफाई कशा पद्धतीने होत असेल याचा विचार न केलेला बरा असे मनसेने आपल्या पत्रकात म्हटले आहे.

ठाणे महापालिकेने ८०% नालेसफाई झाल्याचा दावा केलेला असताना दिव्यात मात्र सगळा सावळागोंधळ दिसून येत आहे. दिव्यात सध्या २०% ते २५% नालेसफाई झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे यावर्षी पुन्हा नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांना मनसे स्टाईल धडा शिकवू असा इशारा दिवा मनसेने दिला आहे. प्रसंगी दिवा शहराध्यक्ष तुषार भास्कर पाटील, शहर सचिव प्रशांत प्रभाकर गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, शरद पाटील, संतोष पाटील,उपविभाग अध्यक्ष, शाखा अध्यक्ष, महिला पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# शिवसेना जिल्हाप्रमुख,नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

## रोजगार मिळाव्यात अनेक युवकांना मिळाल्या नोकरी

**पनवेल । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, आरोग्य व रोजगाराभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांशी बांधिलकी जपत सर्वांना याचा फायदा घेता यावा म्हणून दोन दिवसाच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.दोन दिवस आयोजित समाज उपक्रमांचा लाभ गरीब गरजू लोकांना घेता यावा म्हणून सर्व माध्यमातून प्रसिद्धी करण्यात आली होती. त्यामुळे दोन दिवस आयोजित कार्यक्रमात नागरिकांनी गर्दी केली होती. रविवार, ३१ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत कळंबोली सेक्टर ३ ई येथील सुधागड शाळा हॉलमध्ये भव्य रोजगार व मोफत कोर्सेस मेळावा आयोजित करण्यात आले होते. मेळाव्यात नवी मुंबई आणि परिसरातील १०० हून अधिक नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवून विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. हजारो युवक-युवतींनी उपस्थित राहून नोकरीसाठी अर्ज दाखल केले होते.या सामाजिक उपक्रमाला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी रामदास शेवाळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत युवकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या रोजगार मेळाव्याचे कौतुक केले. रोजगाराच्या वाढत्या संधी युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मेळाव्यात नोकरीच्या संधींसोबतच विविध मोफत कौशल्यविकास अभ्यासक्रमांची माहिती आणि करिअर मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात आले. उपस्थित युवकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले. रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हा सामाजिक उपक्रम युवकांना रोजगाराच्या दिशेने नवी संधी उपलब्ध करून देणारा ठरला असून




परिसरात त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. वाढदिवसानिमित्त रोजगार मेळाव्याचे आयोजन तन्मय रामदास शेवाळे यांनी केले होते. १ मे रोजी नागरिकांच्या आरोग्याची तपासणी तसेच वैद्यकीय सल्ला या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याच दिवशी सकाळी ९ ते ३ दरम्यान मोफत नेत्र तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. गरजू गरीब नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. रामदास शेवाळे यांचा वाढदिवस साजरा करण्याचा एकच उद्देश असतो की यातून गरीब, गरजू नागरिकांची सेवा करता यावी! त्यांना दिलासा मिळावा आपण समजा प्रति काही देणे लागतो आणि याची परतफेड करता यावी म्हणून या वाढदिवसी विविध उपक्रम राबविले जातात यातून जनतेची सेवा होत आहे. दोन दिवस सुरू असलेल्या या कार्यक्रमात युवकांना रोजगाराच्या संधी, नागरिकांसाठी मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरे तसेच आध्यात्मिक कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम करण्यात आले. हा एक उत्सव नसून यातून जास्तीत जास्त समाजाची सेवा कशी करता येईल याकडे लक्ष केंद्रित करण्यात आले या सर्व उपक्रमांतून नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला .

# निवडणुकीच्या प्रचारात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मी आपणासर्वांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे-संतोष थेराडे

**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

तळागाळातून आपल्या समाजाचे नेतृत्व करत असताना निवडणूक प्रचार सभेत आपल्या विकास कामाविषयी दिलेली आश्वासने, मी नक्की पूर्ण करणार असून,भविष्यात मी आपल्या पाठीशीभक्कमपणे उभा आहे. कधीही मला हाक मारा, मी प्रसंगाला नक्कीच धावून येईन, असे वचन कडवई जिल्हा परिषद गटाचे विद्यमान सदस्य, संतोष थेराडे यांनी कुणबी भवन आंबेड खुर्द या ठिकाणी संपन्न झालेल्या वाढदिवसाच्या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना बोलत होते.ते पुढे बोलताना म्हणाले की, माझ्या कार्यकर्त्यांनी व मित्र परिवारांनी खूप मेहनत घेऊन माझ्यावरील प्रेम व विश्वास तसेच आपली सर्वांची उपस्थिती



दर्शवण्यासाठी,वाढदिवसाचे करण्यात आलेले आयोजन बघून मी खरंच भारावून गेलो आहे. व धन्यही झालो.दि १ जून हा वाढदिवस संतोष थेराडे यांचा संपन्न होण्यासाठी त्यांच्या मित्र परिवार, कार्यकर्त्यांनी संगमेश्वर जवळील आंबेड खुर्द येथील कुणबी भवन येथे उत्तम प्रकारचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यासपीठावर उपस्थित असलेले राज मंडप डेकोरेशन मालक विजय कुवळेकर, माजी सभापती कृष्णाजी हरेकर, तुरळ माजी सरपंच अरविंद जाधव, कडवईचे डा.संतोष यादव, यांनी मनोगत व्यक्त करून थेराडे यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मंचावर कसबा गटाच्या जिल्हा परिषद सदस्य विशाखा कुवळेकर, धामणी पंचायत समिती गणाचे सदस्य दत्ता लाखन, कडवई पंचायत समिती गणाच्या सदस्या अपर्णा जाधव, धामणी येथील श्रद्धा हॉटेलचे मालक प्रभाकर घाणेकर ,बाळा शेट्ये, राकेश जाधव, बाळकृष्ण काष्टे, बाबू पवार आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर रत्नागिरी जिल्ह्यात गाजलेले हौशी कलाकार नमन गोळवली यांचा बहारदार, उत्कृष्ट मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सदरचा हॉल खच्चून भरला होता.सदरचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सलग तीन दिवस संतोष थेराडे मित्र परिवार, हितचिंतक,कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन, नुकतीच पीएचडी प्राप्त केलेले निलेश कुंभार यांनी खास शैलीत केले.

# एअर इंडिया इमारतीची पाहणी; दर्जेदार दुरुस्ती व नागरिकांच्या सोयीला सर्वोच्च प्राधान्य-मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईच्या नरिमन पॉईंट येथील ऐतिहासिक 'एअर इंडिया' इमारतीचे महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरण झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी मंत्री भोसले यांनी शासकीय कार्यालयांचे स्थलांतर करण्यापूर्वी इमारतीची सखोल स्ट्रक्चरल तपासणी करण्यात यावी तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतरच अंतर्गत सजावट व इतर विकासकामे हाती घेण्यात यावीत, असे निर्देश दिले.

कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करता दीर्घकालीन टिकाऊपणा लक्षात घेऊन सर्व दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे करण्यात यावीत, असे सांगत त्यांनी विद्युत यंत्रणा, फिटिंग्ज आणि इतर तांत्रिक सुविधांसाठी उच्च दर्जाच्या साहित्याचा वापर करण्यावर भर दिला.



इमारतीच्या मुख्य प्रवेशभागाचे महाराष्ट्राच्या वैभवाला साजेसे आकर्षक व सुशोभित स्वरूप विकसित करण्यात यावे. यासाठी देशातील नामांकित वास्तुविशारद व तज्ज्ञ संस्थांचे मार्गदर्शन घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.राज्याच्या कानाकोपऱ्यातून मंत्रालयीन कामकाजासाठी मुंबईत येणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता, सुलभता आणि व्यवस्था ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे नमूद करत सर्व कामे निर्धारित कालावधीत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री भोसले यांनी दिले.

या मोक्याच्या जागेवरील इमारत खरेदीसाठी राज्य मंत्रिमंडळाने ८ सप्टेंबर २०२३ रोजी मान्यता दिली होती. त्यानंतर विविध प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून राज्य शासनाने 'एअर इंडिया असेट होल्डिंग कॉर्पोरेशन' (AIAHL) कडून १६०१ कोटी रुपयांना ही वास्तू संपादित केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक निधी अदा केल्यानंतर २ जून २०२६ रोजी ही इमारत अधिकृतपणे महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात घेण्यात आली.या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता तातडीने प्रदान करण्याचे आदेशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या ऐतिहासिक वास्तूमुळे राज्य शासनाच्या विविध कार्यालयांसाठी प्रशस्त, आधुनिक आणि सुसज्ज जागा उपलब्ध होणार असून, प्रशासनाची कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) श्री. आबासाहेब नागरगोजे, मुख्य अभियंता सौ. प्रज्ञा वाळके तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी मंत्री भोसले यांना इमारतीची सद्यस्थिती, आवश्यक दुरुस्ती व प्रस्तावित नूतनीकरण कामांबाबत सविस्तर माहिती दिली.यावेळी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, एअर इंडिया इमारतीचे राज्य शासनाकडे झालेले हस्तांतरण हा महाराष्ट्राच्या प्रशासकीय पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. गुणवत्तापूर्ण दुरुस्ती, दीर्घकालीन टिकाऊपणा आणि नागरिकांच्या सोयीला सर्वोच्च प्राधान्य देत या वास्तूचा आदर्श शासकीय संकुल म्हणून विकास करण्यात येईल.

# दिव्यातील १२ वर्षीय देवेंद्रच्या मृत्यूप्रकरणी चौकशीची मागणी

## बोगस डॉक्टरांवर कारवाई करा-अमोल केंद्रे

**संतोष पडवळ । ठाणे**

दिवा शहरातील १२ वर्षीय कु. देवेंद्र आशिष सिंग यांच्या मृत्यूप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच दिवा शहरातील बोगस डॉक्टर, अनधिकृत क्लिनिक आणि परवान्याविना चालणाऱ्या मेडिकल व्यवसायांवर विशेष मोहीम राबवून कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल धनराज केंद्रे यांनी प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात ठाणे पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी, मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन (FDA) यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनानुसार, कु. देवेंद्र आशिष सिंग यांना डॉक्टर कडून औषध देण्यात आले होते. औषध घेतल्यानंतर काही मिनिटांतच त्यांची प्रकृती गंभीर झाली. ते बेशुद्ध पडले तसेच त्यांचे हात-पाय वाकडे झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर त्यांना उपचारासाठी डोंबिवली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती अधिक गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी मुंबईतील केईएम रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र सात दिवस कोमात राहिल्यानंतर १ जून २०२६ रोजी उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.



प्रकरणी वैद्यकीय निष्काळजीपणा अथवा अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाचा संशय व्यक्त करण्यात आला असून संबंधित मुलाला नेमके कोणते औषध देण्यात आले, ते कोणत्या मेडिकल स्टोअरमधून मिळविण्यात आले, औषध डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर देण्यात आले होते का, तसेच संबंधित व्यक्तीकडे वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक पात्रता, नोंदणी आणि परवाने आहेत का याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित व्यक्ती दिवा परिसरात बंगाली डॉक्टर म्हणून उपचार करत होती. घटनेनंतर ती गावी गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ज्या जागेतून वैद्यकीय व्यवसाय चालविला जात होता, त्या जागेचा मालक, कार्यालय चालक अथवा इमारत मालक यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. देवेंद्र सिंग यांचा अवघ्या १२ व्या वर्षी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी दिवा शहरातील सर्व संशयित क्लिनिक, अनधिकृत डॉक्टर, परवान्याविना चालणारे दवाखाने आणि औषध विक्री केंद्रांची संयुक्त तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता (BNS), औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम आणि इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी अमोल केंद्रे यांनी केली आहे.

# एस.आय.ग्रुप इंडिया व सेवा सहयोग फाउंडेशनकडून जि.प.शाळा, भोके मायंगडेवाडीला दोन कपाटांची भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद रत्नागिरीचा वरिष्ठ प्राथमिक गटासाठी आदर्श शाळा पुरस्कार २०२५-२६ प्राप्त जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, भोके मायंगडेवाडीला एस. आय. ग्रुप इंडिया प्रा. लि., नवी मुंबई व सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांनी दोन कपाटे नुकतीच शैक्षणिक कामकाजाच्या वापरासाठी भेट स्वरूपात देणगी म्हणून दिली आहेत. या भेट स्वरूपातील देणगीबाबत प्रशालेत आयोजित छोटेखानी कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्री. मनीष देसाई, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अर्चना मायंगडे, सरपंच श्रीपत मायंगडे यांनी एस. आय. इंडिया ग्रुपचे व सेवा सहयोग फाउंडेशनचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. मनीष देसाई यांनी देणगी स्वरूपात मिळालेल्या दोन कपाटांमध्ये एक कार्यालयीन उपयोगाचे कपाट व एक पुस्तकांचे कपाट असून या दोन्हींची किंमत रुपये बत्तीस हजार असल्याची माहिती दिली. या दोन्ही कपाटांचा उपयोग शाळेसाठी केला जाणार असून, यामधील एक कपाट कार्यालयीन दप्तरासाठी तर दुसरे काचेचे 'बुक डिस्प्ले कबर्ड' पुस्तकांच्या साठवणुकीसाठी वापरले जाणार आहे. पुढील काही दिवसात शाळेत विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांसाठी ज्ञानवर्धक व मनोरंजनात्मक पुस्तकांचे वाचनालय उपलब्ध करून देण्याचा मानस मुख्याध्यापक श्री. देसाई यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५